# **महिला महाविद्यालय,तक्षशिला महाविद्यालयव भारतीय महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने"जीएसटी भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम"**

## **यावरPPT सादरीकरण स्पर्धा संपन्न. (2017-18)**

**प्रस्तावना :-**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ व्दारा संचालित महिला महाविद्यालय श्री.दादासाहेब गवई चॉरिटेबल ट्रस्ट व्दारा संचलित तक्षशिला महाविद्यालय व भारतीय विद्यामंदिर व्दारा संचालित भारतीय महाविद्यालय अमरावती येथील वाणिज्य शाखेव्दारा महिला महाविद्यालय मध्ये जी.एस.टी.चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम या विषयावर जिल्हास्तरीय पीपीटी सादरीकरण स्पर्धा संपन्न झाली.

**अध्यक्ष** :- मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील.(म.म.वि.)

**उदघाटक**:- मा.प्राचार्य डॉ.पद्वल मल्लू

**प्रमुख अतिथी** :- महिला महाविद्यलाय, तक्षशिला महाविद्यालय व भारतीय महाविद्यालय यांच्या

वाणिज्य शाखा.

**परिक्षक** :- 1) प्रा.डॉ.एस.बी.कडू ,विद्याभारती महाविद्यालय , अमरावती.

2) प्रा.निता होनराव, ब्रिजलाल बियाणी महाविद्यालया, अमरावती.

**सहभाग** :-महिलामहाविद्यालय,तक्षशिला महाविद्यालय व भारतीय महाविद्यालयच्या शाखेतीलबी.कॉम भाग 1,2,3 चे विद्यार्थी.

**उद्देश :**

1) विद्यार्थीच्या व्यक्तीमत्वाच्या विकास करणे.

२ )आधुनिक तंत्रज्ञनाच्या वापराविषयी आत्मविश्वास निर्माण करणे.

3) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये विचारांची परस्परांशीदेवाणघेवाण करणे.

## **अहवाल**

स्पर्धेचे उद्घाटन मा.प्राचार्य.डॉ.अविनाश मोहरिल,मा.प्राचार्य.डॉ.पद्वल मल्लू व मा.प्राचार्य.आराधना वैद्य समन्वयक प्रा.डॉ.शालिनी पांडे,प्रा.डॉ.किशोर आकोटकर,मा.प्रा.डॉ.शर्मिष्ठा कुळकर्णी तसेच परिक्षक म्हणून लाभलेले मा.प्रा.डॉ.एस.बी.कडू,मा.प्रा.निता होनराव तसेच वाणिज्य शाखेतील सर्व प्राध्यापक यांच्या उपस्थितीत पार पडले.स्पर्धेच्या उद्घाटनपर भाषणात मा.प्रा.डॉ.पद्वल मल्लू यांनी वाणिज्य शाखेच्या या अभिनव उपक्रमांचे स्वागत केले.विद्यार्थीच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता अश्याप्रकारच्या स्पर्धा सातत्याने घेण्यात याव्यात त्याकरिता आमच्या महाविद्यालयाचे सदैव

सहकार्य राहील असे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी मा.प्राचार्य डॉ.आराधना वैद्य यांनी स्पर्धेकरिता निवडलेला विषय हा आजच्या स्थितीत अतिशय महत्वपूर्ण असून त्यावर तरुण पिठींनी आपले विचार मांडणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.स्पर्धेमध्ये सहभाग घेवून बक्षिसे प्राप्त करणे म्हणजे स्पर्धा जिंकणे नसून स्पर्धेमध्ये आपली मते मांडण्याचे धाडस करणे देखील स्पर्धा जिंकणे होय.त्यामुळे ह्या स्पर्धेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले ते सर्वच ही स्पर्धा जिंकले आहेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षिय भाषणामध्ये मा.प्राचार्य.डॉ.अविनाश मोहरिल यांनी सर्वप्रथम उपस्थित सर्व स्पर्धेकांचे महिला महाविद्यालयातर्फे स्वागत करून जीएसटी हि कर प्रणाली लागू करण्याच्या शासन धोरणावर आजच्या तरुण पीठीने आपले मत व्यक्त करणे हि बाब एक जबाबदारनागरिकत्वाची जाणीव करून देणारी आहे असे मत व्यक्त केले शासन धोरणावर सकारात्मक विचार सादर केल्याबद्दल हि स्पर्धा एक इन्व्हेट नसून ती प्रक्रिया आहे.या स्पर्धकांच्या विचारांबद्दल त्यांनी स्पर्धकांचे अभिनंदन केले.

स्पर्धेच्या प्रथम सत्राच्या अध्यक्ष मा.प्रा.डॉ.शर्मिष्ठा कुळकर्णी यांनी स्पर्धेच्या विषयावर यांनी आपले सादरीकरण केले त्यांचा आढावा आपल्या अध्यक्षिय भाषणात मध्ये घेतला .स्पर्धेच्या दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष मा.प्रा.डॉ.किशोर आकोटकर यांनी स्पर्धकांनी आपले सादरीकरण अधिक प्रभावी होण्यासाठी काहीं महत्वपूर्ण सूचना केल्यात.

जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये अमरावती जिल्हामधील बहुसंख्य महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाली होते.स्पर्धेचा प्रथम क्रमांची मानकरी महिला महाविद्यालयातील कु.राजश्री नेहर हि ठरली तर व्दितीय क्रमांची मानकरी विद्याभारती महाविद्यालय मधील कु.वैष्णवी मुचलंबे तृतीय क्रमांचा भारतीय महाविद्यालय अजिंक्य मेटकर हा ठरला तर प्रोत्साहनपर बक्षिस ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयातील  यश चांडक ह्यांना प्राप्त झाले.स्पर्धेचे परिक्षक विद्याभारती महाविद्यालयाचे प्रा.डॉ.एस.बी.कडू तर ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयांच्या मा.प्रा.निता होनराव यांनी केले. स्पर्धेचे आयोजन प्रा.डॉ.शालिनी पांडे यांच्या मार्गदर्शना खाली झाले. सदर कार्यक्रमास प्रा.मासोद्कर,प्रा.बजाज.प्रा.क्षिरसागर,प्रा.वऱ्हेकर,प्रा.वेद,प्रा.मोटवानी,प्रा.वाधवानी,प्रा.सापरिया यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

**<u>फलनिष्पती</u>:-**

(१) विद्यार्थिनींचा  आधुनिक तंत्रज्ञानाच्या  वापराविषयी न्यूनगंड दूरझाला.

(२) या स्पर्धेत दोन्ही महाविद्यालयातील ३० स्पर्धक सहभागीझाले.

(३) महाविद्यालयातील  विद्यार्थींची परस्परांशी विचारांचीदेवाणघेवाणझाली.

(४) जीएसटी भारतीय अर्थव्यवस्थेविषयी विद्यार्थिनींना माहिती प्राप्त झाली.

(५) संपूर्ण  कार्यक्रमाचे  आयोजन  विद्यार्थिनी केले.

# स्पर्धेचा उद्घाटन कार्यक्रम



**दीप प्रज्वलित करतांना**



कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.प्राचार्य.डॉ.अविनाश मोहरिल यांचे स्वागत करतांना
प्रा.डॉ.शालिनी पांडे



कार्यक्रमाचे उद्घाटक
मा.प्राचार्य.डॉ.पदवल मल्लू यांचे
स्वागत करतांना मा.प्राचार्य.डॉ.अविनाश मोहरिल



कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी
मा.प्राचार्य.डॉ.आराधना वैद्य यांचे स्वागत करतांना
मा.प्राचार्य.डॉ.अविनाश मोहरिल



उद्घाटनपर भाषण करतांना
मा.प्राचार्य.डॉ.पदवल मल्लू



प्रमुख अतिथी मा.प्राचार्य.डॉ.आराधना वैद्य स्पर्धेविषयी
मनोगत व्यक्त करतांना

मा.प्राचार्य.डॉ.



अध्यक्षियभाषण करतांना अविनाश मोहरील.

उपस्थित स्पर्धक वविद्यार्थी








## स्पर्धेचे प्रथम सत्र



प्रथम सत्राचे मा.प्रा.डॉ.शर्मिष्ठा कुळकर्णी यांचे स्वागत करतांना प्रा.डॉ.शालिनी पांडे

अध्यक्षियभाषण करतांना मा.प्रा.डॉ.शर्मिष्ठा कुळकर्णी




## स्पर्धेमध्ये सादरीकरण करतांना स्पर्धक







## स्पर्धेचे दुसरे सत्र



द्वितीय सत्रातील अध्यक्ष प्रा.डॉ.किशोर आकोटकर यांचे स्वागत करतांना प्रा.डॉ.अरुणा वाडेकर

द्वितीय सत्रामध्ये अध्यक्षियभाषण करतांना प्रा.डॉ.किशोर आकोटकर



## स्पर्धेमध्ये सादरीकरण करतांना स्पर्धक








स्पर्धेचे परिक्षण करतांना परिक्षक



स्पर्धेचा निकाल जाहीर करतांना परिक्षक प्रा.डॉ.एस.बी.कडू

बक्षिस स्विकारतांना विजेते स्पर्धक









आयोजन समिती सोबत विविध महाविद्यालयातील स्पर्धक

विजेता स्पर्धकांन सोबत आयोजन चमू



दिव्य मराठी
अमरावती, रविवार, १० डिसेंबर, २०१७ | ४

# ‘जीएसटी’चा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम; पीपीटी सादरीकरणाची स्पर्धा

प्रतिनिधी । अमरावती

स्थानिक भारतीय विद्यामंदिर द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय येथील वाणिज्य शाखा श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचलित तक्षशिला महाविद्यालय तसेच नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ‘जीएसटीचा भारतीय अर्थ व्यवस्थेवरील परिणाम’ या विषयावर जिल्हास्तरीय पीपीटी सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली.



जीएसटीवरील पीपीट्टी सादरीकरण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना भारतीय महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ अनुराधा वैद्य

स्पर्धेचे उद्‌घाटन महिला महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अविनाश मोहरिल, तक्षशिला महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.पडवाल मल्लू व भारतीय महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आराधना वैद्य, समन्वयक प्रा. डॉ. शालिनी पांडे, प्रा. डॉ. किशोर आकोटकर, प्रा. डॉ. शर्मिष्ठा कुळकर्णी तसेच परीक्षक म्हणून प्रा. डॉ. एस. बी. कडू, प्रा. निता होनराव, वाणिज्य शाखेतील सर्व प्राध्यापक यांच्या उपस्थितीत पार पडले. स्पर्धेचे उद्घाटन करताना प्रा. डॉ. पडवाल मल्लू यांनी वाणिज्य शाखेच्या या अभिनव उपक्रमांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता अशा प्रकारच्या स्पर्धा सातत्याने घेण्यात याव्यात. त्याकरिता आमच्या महाविद्यालयाचे सदैव सहकार्य राहील असे आश्वासन दिले. प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. आराधना वैद्य यांनी स्पर्धेकरिता निवडलेला विषय हा आजच्या स्थितीत अतिशय महत्वपूर्ण असून तरुण पिढींनी आपले विचार मांडणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. स्पर्धेत सहभाग घेवून पुरस्कार प्राप्त करणे म्हणजे स्पर्धा जिंकणे नसून स्पर्धेत मते मांडण्याचे धाडस करणे देखील स्पर्धा जिंकणे होय. त्यामुळे या स्पर्धेत ज्या विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले ते सर्वच ही स्पर्धा जिंकले आहेत असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य. डॉ. अविनाश मोहरिल यांनी जीएसटी ही कर प्रणाली लागू करण्याच्या शासन धोरणावर तरुण पीढीने मत व्यक्त करणे ही एक जबाबदार नागरिकत्वाची जाणीव करून देणारी आहे असे म्हटले. प्रथम सत्राच्या अध्यक्ष प्रा. डॉ. शर्मिष्ठा कुळकर्णी यांनी विषयावर सादरीकरण केले. दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष प्रा.डॉ.किशोर आकोटकर यांनी स्पर्धकांनी आपले सादरीकरण अधिक प्रभावी होण्यासाठी काहीं महत्वपूर्ण सूचना केल्यात. स्पर्धेमध्ये अमरावती जिल्ह्यामधील बहुसंख्य महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाली होते. स्पर्धेचे परीक्षक प्रा. डॉ. एस. बी. कडू, प्रा. निता होनराव यांनी केले. स्पर्धेचे आयोजन प्रा. डॉ. शालिनी पांडेंच्या मार्गदर्शनाखाली झाले.

**राजश्री नेहरला प्रथम क्रमांक** : स्पर्धेत प्रथम क्रमांकाची मानकरी महिला महाविद्यालयातील राजश्री नेहर ठरली. द्वितीय क्रमांकाची मानकरी विद्याभारती महाविद्यालय मधील वैष्णवी मुचलंबे, तृतीय क्रमांक भारतीय महाविद्यालय अजिंक्य मेटकरने प्राप्त केला. प्रोत्साहनपर बक्षिस ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयातील यश चांडक याला मिळाले.